महाराष्ट्र पोलीस
# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com

---

## प्रेसनोट

दिनांक :- १५/११/२०१८

## रेकॉर्डवरील सराईत दरोडेखोरास स्थागुशाचे पथकाने घेतले ताब्यात

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो यांचे आदेशान्वये जिल्हयातील पोलीस ठाणेनिहाय अभिलेखावरील सराईत गुन्हेगार, गुन्हयात पाहिजे असलेले व फरार आरोपीतांचा शोध घेवुन अटक करण्याची कारवाई सुरू आहे. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांचे पथकाने **जायखेडा पोलीस ठाणे । गुन्हा रजि. नं. ६४/२०१४** भादवि कलम ३९५, ३९७, व **। गुन्हा रजि.नं. ६६/२०१४ भादविक ३७९** या दोन्ही गुन्हयात सुमारे ०५ वर्षापासुन पाहिजे असलेला सराईत गुन्हेगार नामे रवि लाल्या भोसले, ता.वैजापुर, जि.औरंगाबाद यास ताब्यात घेवुन कारवाई केली आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयातील पोलीस ठाणेनिहाय दाखल असलेले गुन्हयांतील जे निष्पन्न आरोपी गुन्हा घडलेपासुन पाहिजे व फरार आहे, अशा आरोपीतांचा शोध घेवुन त्यांना अटक करणेसाठी पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास मार्गदर्शन करून सुचना दिल्या होत्या. दरम्यान सन २०१४ मध्ये जायखेडा पोलीस ठाणेस दाखल असलेले दरोडयाचे गुन्हयातील पाहिजे असलेला सराईत दरोडेखोर हा मनमाड शहरात आला असल्याची गोपनीय माहिती मिळालेवरून स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील पोलीस उपनिरीक्षक श्री. स्वप्निल नाईक, सपोउनि अशोक पाटील, पोना चेतन संवत्सरकर, राजु सांगळे, पोकॉ गिरीष बागुल, हरीष आव्हाड यांनी मनमाड रेल्वे स्टेशन परिसरात सापळा रचुन **सराईत गुन्हेगार** नामे **रवि लाल्या भोसले, वय ४५, रा. जरूर, ता.वैजापुर, जि.औरंगाबाद** यास शिताफिने ताब्यात घेतले. सदर आरोपी हा सुमारे ०५ वर्षांपासुन वरील गुन्हयात पाहिजे होता, त्याने सन २०१४ मध्ये त्याचे इतर ०७ ते ०८ साथीदारांसह सटाणा तालुक्यातील नामपुर येथील शिवनेरी कॉलनीतील धनदाई बंगल्यात दरोडा टाकुन फिर्यादी व साक्षीदार यांना जबर मारहाण व गंभीर दुखापत करून सुमारे ०४ लाख रूपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने लुटमार करून नेले होते. सदर गुन्हयात औरंगाबाद जिल्हयातील एकुण ०७ आरोपीतांना यापुर्वीच अटक करण्यात आली होती, परंतु आरोपी रवि भोसले हा गुन्हा घडल्यापासुन फरार होता. त्यास स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने शिताफिने ताब्यात घेवुन जायखेडा पोलीस ठाणेकडील वरील दरोडयाचे गुन्हयामध्ये हजर केले असुन त्याचेकडुन जबरी लुटमार, घरफोडी, चोरीचे अजुन काही उघडकीस येण्याची शक्यता आहे.